इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड • भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड • हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

(मागील पानाचा शेष)

६. पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या सर्व व्यक्ती नमुन्यानुसार अर्ज सादर करू शकतील. अर्ज विहित नमुन्यानुसार कोऱ्या कागदावरून प्राधान्याने टाइप करून किंवा स्वच्छ हस्ताक्षरातून सादर करावा.

७. अर्ज करतेवेळेस अर्जदार विविध ठिकाणांसाठी अर्ज करू शकतो. प्रत्येक ठिकाणासाठी वेगळा अर्ज सादर करावा, ज्यासाठी प्रत्येक बाबतीत वेगळे अर्ज शुल्क लागू असेल.

८. अर्जासमवेत अ. क्र. ९ मधील तक्त्यामध्ये निर्देशित केल्यानुसार कोणत्याही शेड्युल्ड बँकेद्वारे जारी रु. १०००/- (रु. एक हजार मात्र) ची नापरतावा योग्य शुल्क व एससी/एसटी उमेदवारांच्या संदर्भात (अजा/अज प्रमाणपत्र जोडावे) रु. ५००/- (रु. पाचशे मात्र) धनाकर्ष/पे ऑर्डरच्या स्वरूपातून जोडावे.

९. सर्व दृष्टीने परिपूर्ण सहपत्रे व कोणत्याही शेड्युल्ड बँकेद्वारे जारी नापरतावा अर्ज शुल्काचा धनाकर्ष/पे ऑर्डर यांसहित एलपीजी वितरक म्हणून अर्ज खालील निर्देशित पत्त्यावरील कार्यालयात दिनांक २९/१०/२०१३ रोजी कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वी सादर करणे अनिवार्य आहे.

जाहिरात स्थान अ. क्र.		... या नावे जारी कोणत्याही शेड्युल्ड बँकेचा धनाकर्ष/पे ऑर्डर	देय ठिकाण	जोडपत्रासह व अर्ज प्रक्रिया शुल्कासह अर्ज जमा करण्याचे ठिकाण
पासून	पर्यंत			
१	२६७	भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	मुंबई	बीपीसी एलपीजी डिस्ट्रिब्युटर सिलेक्शन सेल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, एलपीजी वेस्टर्न रिजन, ए इन्स्टॉलेशन, शिवडी फोर्ट रोड, शिवडी पूर्व, मुंबई ४०००१५
२६८	३११	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	औरंगाबाद	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, एलपीजी रिजनल ऑफिस, प्लांट, एच-१, एमआयडीसी, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, औरंगाबाद ४३१००६
३१२	३५१	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	नागपुर	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, खापरी एलपीजी प्लांट, खापरी रेल्वे स्टेशन जवळ, खापरी, नागपुर ४४११०८
३५२	४१८	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	नवी मुंबई	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, उसर एलपीजी प्लांट, ए-२ उसर औद्योगिक क्षेत्र, अलिबाग-रोहा रोड ४०२२०३
४१९	४८९	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	पुणे	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, चाकण एलपीजी प्लांट, तळेगाव चाकण रोड, विलेज महालुंगे-इंगळे, चाकण, तालुका-खेड, जिल्हा पुणे ४१० ५०१
४९०	४९२	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड	मुंबई	हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई रीजनल ऑफिस, ल. यू. गडकरी मार्ग, एच. पी. रिफाइनरीच्या मागे, चेंबूर, मुंबई ४०००७४
४९३ ५२८	४९८ ५३०	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड	औरंगाबाद	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, इंडेन एरिया ऑफिस, अभिष टावर्स, १ला माळा, बाबा पेट्रोलपंपाच्या मागे, महावीर चौक, औरंगाबाद ४३१००१
४९९ ५३१	५१४ ५३८	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड	नागपुर	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, इंडेन एरिया ऑफिस, १ ला माळा, आकर्षण बिझीप्लेक्स, २६, सेंट्रल बाजार रोड, रामदासपेठ, नागपुर ४४००१०
५१५ ५३९	५२७ ५५१	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड	पुणे	इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड, इंडेन एरिया ऑफिस, अदिती कॉमर्स सेंटर, ५वा माळा, ऑफिस नं. १ आणि ४, २४०६ ईस्ट स्ट्रीट कॅम्प, पुणे, छावणी, पुणे ४११००१

१०. भरपाई/तक्रार निवारण पद्धत

अर्जदाराकडून आलेल्या कोणत्याही तक्रारीचे खालील प्रकारे निवारण करण्यात येईल :

अ) तक्रारदारास तक्रारीसमवेत तक्रार शुल्क म्हणून रु. १०००/- संबंधित ओएमसीच्या नावे धनाकर्षाच्या स्वरूपात सादर करावे लागतील. रु. १०००/- जमेशिवाय प्राप्त झालेल्या तक्रारींवर अन्वेषण करण्यात येणार नाही.

ब) निनावी तक्रारींचे शक्यतो निवारण करण्यात येणार नाही.

क) अर्जदार ड्रॉमध्ये निवडला गेला असल्यासच त्याच्या तक्रारींचे अन्वेषण करण्यात येईल.

ड) ड्रॉचा निकाल घोषित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत ओएमसी कार्यालयाद्वारे तक्रार प्राप्त झाल्यावरच त्यावर विचार करण्यात येईल.

ई) निवड झालेल्या उमेदवाराबद्दल तक्रार प्राप्त झाली परंतु ती **निकाल घोषित** झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत प्राप्त झाल्यास, अशा तक्रारींचे परीक्षण करण्यात येईल व योग्य ती कारवाई करण्यात येईल.

११. सर्वसाधारण

अ) कोणतेही कारण न देता आपल्या पूर्ण अथवा‌रित सदर जाहिरात रद्द करणे/काढून घेणे/सुधारणे किंवा नियत तारीख वाढवण्याचा अधिकार कंपनीकडे राखून आहे.

ब) अर्जदारांनी एका ठिकाणासाठी एकच अर्ज सादर करावा. एखाद्या व्यक्तीकडून एकाहून अधिक अर्ज प्राप्त झाल्यास ते एकत्रित करण्यात येतील व त्यांना एकच अर्ज समजण्यात येईल व अन्य सर्व अर्जांचे शुल्क जप्त करण्यात येईल.

क) अर्जदाराने अर्जाच्या सर्व पृष्ठांवर क्रमांक टाकावेत, यामध्ये त्यासमवेत जोडलेल्या प्रतिज्ञापत्राचाही समावेश असावा व प्रत्येक पानावर स्वाक्षरी करावी. **अर्जासमवेत सादर करावयाची सर्व प्रतिज्ञापत्रे/करारपत्रे मूळ स्वरूपात असावीत.**

ड) अर्ज प्रारूपात अपेक्षित असलेले दस्तावेजच केवळ अर्जासमवेत सादर करावेत. अर्जासमवेत जोडलेल्या अन्य दस्तावेजांवर विचार केला जाणार नाही.

ई) टपाल विलंबासहित, अंतिम तारखेपश्चात प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अशा बाबतीत संबंधित तेल कंपनीद्वारे कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

फ) खुल्या प्रवर्गांतर्गत जाहिरातीत प्रसिद्ध केलेल्या ठिकाणांकरिताची बाब वगळता, अन्य प्रवर्गांसाठी पात्रता प्रमाणपत्रे अर्जासमवेत सादर करण्यात यावीत. तथापि, संरक्षण अधिकारी श्रेणीअंतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांना लॉट्सच्या ड्रॉच्या दिवशीसुद्धा डीजीआरकडील मूळ पात्रता प्रमाणपत्र सादर करण्याची सवलत आहे.

ग) अर्जदाराद्वारे अर्जात नमूद कथन किंवा अर्जासमवेत जोडलेले दस्तावेज वा अर्जानंतर सादर केलेले दस्तावेज पुढील कोणत्याही टप्प्यावर लपविलेले/चुकीचे सादरीकरण असलेले/चुकीचे वा खोटे पात्रता निकषांवर बाधा आणणारे असल्यास कोणतेही कारण न देता अर्ज रद्द करण्यात येईल व अर्जदार जर वितरक म्हणून नियुक्त झाला असल्यास त्याची डिस्ट्रिब्युटरशिपसुद्धा रद्द करण्यात येईल. अशा बाबतीत उमेदवार/वितरकाला संबंधित केल कंपनीकडे कोणताही दावा करता येणार नाही.

ह) निवड झालेल्या उमेदवाराना 'फील्ड वेरिफिकेशन ऑफ क्रेडेन्शियल्स' (FVC) करण्यापूर्वी लागू असेल त्यानुसार संबंधित ऑइल कंपनीकडे रु.२५,०००/- किंवा रु.५०,०००/-एवढ्या रकमेची ठेव जमा करावी लागेल. निवड झालेल्या उमेदवाराने सदरहू रककम न भरल्यास त्याची/तिची निवड रद्द केली जाईल. अर्जामध्ये दिलेली माहिती जर खोटी/चुकीची/गैरप्रतिनिधित्व दिलेली आढळली तर उमेदवाराची निवड 'एफवीसी' पूर्वीच रद्द केली जाईल आणि जमा केलेली ठेवीची रक्कम जप्त केली जाईल.

च) अर्जामध्ये नमूद बाबींनुसार मागणी केलेली सर्व माहिती अर्जदाराने देणे आवश्यक आहे. अर्जदाराची निवड झाल्यास फेरतपासणीच्या वेळी, त्याने अर्जात दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने सर्व पुरक कागदपत्रे मूळ प्रती पुरविणे गरजेचे आहे. अशा पध्दतीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती दाखविल्या नाहीत तर, क्षेत्रीय तपासणी (एफव्हीसी) साठी झालेली निवड रद्द के ली जाईल, तसेच या निवडीपूर्वी भरलेले 'डिपॉझिट' जप्त के ले जाईल.

छ) परिपूर्ण भरलेले अर्ज लिफाफ्यात घालून त्यावर ठळक अक्षरात "(तेल कंपनीचे नाव) _____ या कंपनीच्या (ठिकाणाचे नाव) _____ येथील वितरक होण्यासाठी अर्ज" असे लिहावे.

ज) ही प्रमाणबध्द व्यवसाय करण्यासाठी संधी असून ही संधी म्हणजे संबंधित तेल कंपनीची नोकरी नव्हे. तसेच या व्यवसायातही व्यावसायिक धोके - आव्हाने आहेत आणि या व्यवसायातून ठराविक नफा किंवा मिळकत होईलच, अशी हमी दिलेली नाही.

झ) हा फक्त एक अर्ज आहे व हा एलपीजी वितरक होण्यासाठी प्रस्ताव नव्हे.

RB/13285M